# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 174/2023 दिनांक : 30.04 .2023

## 1)खुनाचा प्रयत्न :—

**विमानतळ :—**दिनांक 21.04.2023 रोजी 00.15 वा. चे सुमारास, **विद्युतनगर येथे फिर्यादीचे दुकानासमोर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून यातील फिर्यादी हा त्यांचे दुकानातमध्ये झोपला असता दुकानाचे बाहेर आवाज आल्याने उठुन बघितला असता यातील आरोपी क्रं एक हा फिर्यादीचे दुकानाचे लाईट मिटरचे वायर तोडत असतांना फिर्यादीने त्यास पाहुन मिटर वायर का तोडत आहेस तु कोण आहेस असे विचारले असता मी सुमनबाई सगर, कडगे, व रिनणे यांचे सांगणेवरून कॅमेरे व मिटर कट करत होतो.फिर्यादीने त्यास तु मिटरचे वायर तोडु नको म्हणताच यातील आरोपी क्रं. दोन,तिन,चार यांनी मला म्हणाले कि कोनी अडचन केल्यास त्यास मारा बाकी आम्ही बघुल घेतो असे म्हणाल्याने यातील आरोपी क्रंमाक एक याने फिर्यादीस थापडाने मारहाण करून त्याचे हातातील लोखंडी गजाळीने फिर्यादीस जिवे मारण्याचे उदेशाने डोक्यावर मारत असतांना फिर्यादीने डाव्या हाताने अडविले असता गजाळी डाव्या दंडावर लागुन गंभीर दुखापत झाली.व खुन करण्याचा प्रयत्न केला वगैरे **फिर्यादी जेनेंद्र बाबुराव केंद्रे, वय 48 वर्षे, व्यवसाय नोकरी रा.नाईकनगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 153/**2023 कलम** 307,109,34, भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बिरकुले, मो. नं. 9683652730**हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :—

**1)किनवटः—** दिनांक 28.04.2023 रोजी 01.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी शाहुनगर गोकुंदा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा मुलाबाळा सह स्लॉपवर झोपले असता अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे दरवाजाचे कडी कोंडा काढुन आत प्रवेश करून घरातील कपाटातील ठेवलेले नगदी 2000/—रूपये चोरुन नेला आहे. वगैरे **फिर्यादी सिताराम राजाराम राजटकरवार वय 46 वर्षे, व्यवसाय व्यापारी रा.शाहुनगर गोकुंदा ता.किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 108/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1062 वाडगुरे, मो.क्र 8805981062** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगरः—** दिनांक 28.04.2023 रोजी 22.00 वा ते दिनांक 29.04.2023 रोजी चे 07.00 वा चे दरम्यान, **गजानन मंदीर कामानजवळ मालेगाव रोड नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा कुटुंबा सोबत काकु वारल्यामुळे घराला कुलुप लावुन गावाकडे गेला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने कुलुप तोडुन घरात प्रवेश करून घरात ठेवलेला विवो कंपनीचा मोबाईल किंमती 10,000/—रूपयाचा कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी चोरून नेले. वगैरे **फिर्यादी गजानन आबासाहेब देशमुख , वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. रंनाथनगर गजानन मंदीर कमानी जवळ मालेगाव रोड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 171/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2309 जाधव, मो.क्रं. 9049343095** हे करीत आहेत.

**3)भोकरः—** दिनांक 29.04.2023 रोजी 20.00 वा ते दिनांक 29.04.2023 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **राधेश्याम ट्रेडर्स दुकान व श्रीकृष्ण मेडीकल बटाळा ता.भोकर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे श्री राधेशाम ट्रेडर्स तसेच श्रीकृष्ण मेडीकल,श्रिती हाडवेअर,विराज मेडीकल असे दुकान व मेडीकलचे शटर अर्धवट उघडुन वाकुन दुकानात व मेडीकल मध्ये प्रवेश करून दुकानात ठेवलेले नगदी 1,10,,000/—रूपये व श्रीकृष्ण मेडीकल मधिल नगदी 19,000/— रूपये एकूण 1,29,000/— रुपये चोरुन नेला आहे. वगैरे **फिर्यादी सतिश भगवाराव कापसे, वय 32 वर्षे, व्यवसाय श्री राधेश्याम ट्रेडर्स दुकान रा. बटाळा ता.भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 151/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री.दिगांबर पाटील, मो.क्रं 9850550670** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुःखापत :—

**कंधारः—**दिनांक 26.04.2023 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतातील आखाडयावर मौ.हासुळ ता.कंधार जि.नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस व त्याचे भावास तुला पांदन रस्ता पाहिजे काय म्हणुन तहसिलदार साहेब यांना तु अर्ज दिलास व पोलीस बंदोबस्त मागवतोस म्हणुन शिवीगाळ करून यातील आरोपीतांनी काठीने व कुराडीने फिर्यादीचे व फिर्यादीचे भाऊ,पुतण्या हयांना त्यांचे जबडयावर मारून तोंडातील दोन दात पाडले व कुऱ्हाडीने डाव्या पायाचे गुडघ्या जवळ मारून गंभीर दुखपत केली व काठीने उजवे हाताचे पंजावर मारून बोटे मोडले व कत्तीने उजवे पायाचे नळीवर मारून गंभीर दुखपत केली व साक्षीदा यांना काटयाने मारून मुक्कामार दिला व थापडा बुक्याने मारून जिवे मारण्याची धमकी दिली.वगैरे **फिर्यादी सुभाष हनुमंतराव भोरगीर, वय 52 वर्षे, रा. हासुळ ता.कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 121/2023 कलम 326,324,323,504,506,143,147,148,149 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2259 श्रीरामे, मो.क्रं. 942176652**हे करीत आहेत.

## 4)मो.सा. चोरी :–

**देगलुर** :–दिनांक 26.04.2023 रोजी 21.00 वा. ते 21.30 वा. चे दरम्यान,**जुने बसस्थानक समोर देगलुर ता.देगलुर जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी यांची बजाज कंपनीची सिटी 100 मो.सा. क्रं. एम.एच.26/बी.बी.–9937 किंमती 30,000/– रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी गंगाधर शेषेराव रामटेके, वय 26 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. देशमुखनगर ता.देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 223/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/580 तलवारे, मो.क्रं. 9657707295** हे करीत आहेत.

**वजिराबादः**–दिनांक 29.04.2023 रोजी 14.45 वा. ते 17.10 वा. चे दरम्यान, **बोरबन फॅक्टरी वजिराबाद राहते घरासमोर नांदेड येथे**, यातील फिर्यादी यांची होन्डा ॲक्टीव्हा थ्री.जी एम.एच.26/बी.एफ.–0910 किंमती 40,000/– रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी शिल्पा बाबुराव वाघमारे, वय 27 वर्षे, व्यवसाय घरकाम/ होमगार्ड रा.बोरबन फॅक्टरी वजिराबाद नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 143/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/ 1007 झांबरे, मो.क्रं. 9923922533** करीत आहेत.

## 5)मोबाईल चोरी :–

**वजिराबादः**–दिनांक 28.04.2023 रोजी चे 09.56 ते 10.00 वा. चे दरम्यान, **बसस्थानक वजिराबाद नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा वजिराबाद कडुन कोर्ट कडे जात असतांना खिश्यात ठेवलेला पोको एक्स 3 कंपणीचा मोबाईल किंमती 20000/–रूपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी श्रीपाल नामदेवराव हाटकर, वय 40 वर्षे, व्यवसाय रा.ईजळी ता.मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 144/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/412 कानगुलवार, मो.क्र. 9923696860** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**देगलुरः**–दिनांक सप्टेंबर 2022 पासुन ते दिनांक 05.01.2023 चे दरम्यान, **फिर्यादीचे माहेरी सासरी कावळगाव सासवड पुणे ह. मु. कावळगाव देगलुर ता.देगलुर जि.नांदेड येथे**, यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला काळी आहेस तु आम्हाला पसंद नाहीस असे म्हणुन तुला नांदायचे असेल तर मोटार सायकल घेण्या साठी माहेरहुन 100000 /–रूपये घेवुन ये म्हणुन पैशाची मागणी करून मारहाण व शिवीगाळ करून शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 224/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2332 पल्लेवाड, मो.क्रं.9821159844** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :–

**1)मरखेलः**– दिनांक 29.04.2023 रोजी 20.00 वा. चे सुमारास, **मरखेल बसस्थानक ता. देगलुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी हातभट्टी दारू किंमती 2500/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री विष्णुकांत तुकाराम गुट्टे,. ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड मरखेल** गुरनं 95/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोना/**338 वाघमारे, मो.नं.9552514590** हे करीत आहेत.

**2)बिलोलीः**– दिनांक 28.04.2023 रोजी 22.58 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरासमोरील मोकळया जागेत ता.बिलोली जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या शिंदी किंमती 1600/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/व्यंकटी सुभाषराव घोंगडे,. ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 64/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोना/**2351 मुदेमवार, मो.नं.9049778709** हे करीत आहेत.

**3)मुदखेडः**– दिनांक 29.04.2023 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **आरोपीचे राहते घराचे पाठीमागे मोकळया जागेत मुदखेड ता.मुदखेड जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 12000/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/3243 गंगाधर विठ्ठलराव कदम,. ने.स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 93/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**1375 ठाकुर, मो.7774051375** हे करीत आहेत

## 8)जुगार :–

**1)विमानतळः–** दिनांक 29.04.2023 रोजी 16.10 वा. चे सुमारास, **हनुमानगड कमानी समोर महाराण प्रताप सोसायटी कडे जानाऱ्या सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1520/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/106 दिपक राजाराम पवार, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 154/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** सपोउपनि/**पांचाळ, मो.क्रं. 9423437844** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 175/2023 दिनांक : 30.04.2023

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज"** यांची जयंती साजरी

30 एप्रिल, 2023 रविवार रोजी **"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज"** या महापुरूषांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शना खाली सह सर्व उपस्थितांनी पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **श्री व्दारकादास चिखलीकर,पोनि स्थागुशा,सपोनी माने,पोउपनि सोनवणे** ,यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार तसेच मंत्रालयीन कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **मपोकॉ/शामका पवार, पोकॉ/विनांदे भंडारे** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड



# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र. 173 / 2023                    दिनांक : 29.04 .2023

**अट्टल गुन्हेगार चांदू कदम** यास सहा **महिन्यासाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार** केले.

नांदेड. सन 2016 पासून सतत वेगवेगळ्या गंभीर गुन्ह्यात पोलिसांच्या दप्तरी नोंद असलेला अट्टल गुन्हेगार चांदू दिगंबर कदम ;वय 35 वर्षे याला परभणी, नांदेड, लातूर आणि हिंगोली जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपारीचा प्रस्ताव लिंबगाव ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार यांनी पाठविला होता. उपविभागीय अधिकारी विकास माने यांनी चांदु कदम याला सहा महिन्यासाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार केले आहे.

नांदेड तालुक्यातील निळा येथे राहणारा चांदू दिगंबर कदम हा 2016 पासून हातात घातक शस्त्र सतत वापरत असे, वेळप्रसंगी तो दहशत पसरवत अनेकांना जखमी करत असे, त्यातून अनेक गुन्हे त्याच्या नावावर लिंबगाव पोलीस ठाण्यात दाखल आहेत. एवढेच नाही तर शासकीय मालमत्तेचे नुकसान, शासकीय कर्मचाऱ्यांना मारहाण यासह आदी गंभीर गुन्हे त्याच्याविरुद्ध दाखल होते. निळा या गावात व परिसरात त्याची दहशत होती. त्या दहशतीचा बिमोड करण्यासाठी उपविभाग नांदेड ग्रामीणचे सहाय्यक पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात आला होता. मा. गौहर हसन यांनी सखोल तपास करून प्रस्ताव मंजूर करून तो उपविभागीय अधिकारी नांदेड विकास माने यांच्याकडे पाठविला. आरोपी चांदु कदम हा सराईत व सवयीचा गुन्हेगार असल्याने उप विभागीय अधिकारी, विकास माने यांनी चांदु कदम याला नांदेड जिल्ह्यातून सहा महिन्यासाठी हद्दपार केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड